॥ नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्त ॥

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळाचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडूज

ता.खटाव , जि.सातारा.



## मराठी विभाग

उपक्रम विषय - दलित साहित्य (अण्णाभाऊ साठे)

उपक्रम सादर करणाऱ्याचे नाव - जाधव सायली विट्ठल

रोल नंबर- ५१९

सत्र ६ वे

वाङ्‌मय प्रवाहाचे अध्ययन

मार्गदर्शक

**प्रा.आवळे सर**

अधिव्याख्याता

**कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज**

सन-२०१७-१८



Scanned with CamScanner

## १) फकिरा

- आण्णा भाऊ साठे

झुजुरकाचा तो विरविरीत पडदा नियतीनं हळूच दूर करताच पूर्तता अरुणोदय झाला. गडद रंगात दशादिशा झगमगू लागल्या. नवा प्रकाश फुलला. नवे गीत गाऊ लागले. नव्या प्रकाशात नवे वारे भिरभिरु लागले. सृष्टीला नवा साज चढल्याचा भास होऊ लागला. टाळगावच्या शेवटच्या टोकाला डाव्या बगलेवर रामरावांचा तो भव्य वाडा शांत उभा होता. पाखरांना आनंद झाला. आज सूर्योदयापूर्वीच रामरावानं स्नान उरकल होत.

## २) गजाआड

- आण्णा भाऊ साठे

डोंगराची एक ओळ मधोमध धनुष्याच्या कमानीखाली वाकली. त्या वाकण्यात पारगाव कसला होता. त्यानं डोंगराला पाठ लावून उगवतीकडे तोंड केलं होतं. डोंगराच्या दोन्ही खांद्यावरुन दोन पाणलोट खाली येऊन गावाच्या दोन्ही बाजूंनी गावंदरीला त्यांचा संगम होत होता. आणि तेथून पुढे त्याला एका ओढ्याचा आकार येऊ लागला होता. पारगावच्या शिवारातून सरळ पूर्वेला जाऊन दोन मैलांवर वारणा नदीला मिळत होता.

Scanned with CamScanner

## ३) रानबोका

- आण्णा भाऊ साठे

पश्चिमेला सह्याद्री पर्वत शांत उभा होता. त्यात आपले अनेक शिखर खांद्यावर घेतली आहेत. निती शिखर आकाशाला चिमटा घेत होती. डोंगरी वारा तळवटाने वाहत होता. आणि तो चैत्र महिना एक दिवस मागे टाकत वैशाखात गेला होता. शिवारात भरलेली पीक कधीच गावात गेली होती. त्यामुळे वैराण उजाड झालं. सूर्य मंद पावलांनी निघाला होता. त्याच्या पुसट सावल्या आणि त्याच वास्तव्य संपुष्टात होत.

## ४) कैफियत

- आण्णा भाऊ साठे

**फकिरा** या माझ्या कादंबरीत बरोबर थोडीशी कैफियत सादर करत आहे. तशी प्रतिमेला वास्तवाची गरज भासते. कल्पनेतही जीवनाची परत असणे आवश्यक असते. म्हणून सदैव सहानूभूतीनं लिहीण्याचा प्रयत्न करतो. ती त्याची माणसं असतात. **कैफियत** या कांदबरीत जे साकार नाही ते आकार देण्याचे सामर्थ्य आहे. जे आहे ते सामावले आहे.जे पाहिलं अनुभवलं ऐकलं तेच मी लिहीलं आहे. त्यातूनच हा **कैफियत** निर्माण झाला.

Scanned with CamScanner